# नियमित दिवाणी दावा क्रमांक १७१/२०२३ मधील निशाणी क्र. ४७ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी प्रतिवादी क्र. ०३ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दिला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.०३ लक्ष्मण मारुती शिंदे हे दावा चालू असताना दिनांक १२.११.२०२५ रोजी मयत झाले आहेत. ते मयत झाले त्यावेळी त्यांना अर्जामध्ये नमूद असणारे व्यक्ती हे हिंदू वारसा कायद्याप्रमाणे कायदेशीर वारस आहेत. सबब, प्रतिवादी क्र.०३ चे नावापुढे मयत वारस असे लिहून त्याप्रमाणे दुरुस्ती करुन अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे वारसांची नावे नमूद करण्याची व तशी दुरुस्ती करण्याची वादीस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास हरकत घेतली. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात नमूद केल्या वारसांत व्यतिरिक्त इतर कोणी वारस आहेत किंवा नाही याबाबत वेगळे ॲफिडेव्हीट दिले नाही. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

३. प्रतिपक्षांच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागणी केल्यानुसार प्रतिवादी क्र.०३ चे वारस दाव्यात दुरुस्तीने अभिलेखावर घेण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मी मां सा

४. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतींचे वाटप होऊन कब्जा मिळण्यासाठी व निरंतर ताकीदिसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ०३ लक्ष्मण मारुती शिंदे हे दावा चालू असताना दिनांक १२.११.२०२५ रोजी मयत झाले आहेत. ते मयत झाले त्यावेळी त्यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जामध्ये नमूदच कायदेशीर वारस होते व आहेत. प्रतिवादी क्र. ०३ चे वारसांना त्यांचे पश्चात दावा चालविण्याचा हक्क असल्याने दावा गुणदोषावर चालणेसाठी प्रतिवादी क्र. ०३ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही अगर दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.०३ चे वारस सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ०३अ ते ०३ड म्हणून अभिलेखावर घेण्यात येत आहे. सदर दुरुस्ती ही वादी यांनी आजपासून १४ दिवसाचे आत करावयाची आहे.

३. वादीनी योग्य त्या दुरुस्तीसह दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

VAIBHAV BAJRANG GHADAGE Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE Date: 2026.01.07 18:02:04 +0530

( व्ही. बी. घाडगे )

दिनांकः- ०७.०१.२०२६ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.